# जाहिर निविदा.
# चिपळूण नगर परिषद, चिपळूण.
## (पाणी पुरवठा विभाग)

चिपळूण नगर परिषद हद्दितील खालील रकाना क्र. २ मधील नमूद कामाकरीता दोन लखोटा पध्दतीने सिलबंद निविदा मागविणेत येत आहे. इच्छुक संस्था / व्यक्ती / कंपनी यांनी विहित नमुन्यातील सिलबंद निविदा दिनांक १४/०६/२०१० रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत प्रशासकिय अधिकारी यांचे चेंबर मधील निविदा पेटीमध्ये टाकाव्यात.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकिय रक्कम | बयाणा रक्कम | पुरवठादाराची पात्रता | कामाची मुदत | निविदा फॉर्मची किमंत |
|---|---|---|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **४** | **५** | **६** | **७** |
| १. | **पाणी पुरवठा व्यवस्थापन सेवा पुरविणे -** गोवळकोट, कांगणेवाडी, पाग, उपनगर पंपहाऊस केंद्र ऑपरेट करुन त्याची देखभाल करणे व त्याची स्वच्छता ठेवणे, क्लोरीन गॅस युनिट चालविणे, तुरटी व ब्लिचिंग पावडरचा वापर करणे, टाकीमधून शहरात ठिकठिकाणी वेळेत व्हॉल्व ऑपरेट करुन पाण्याचे वितरण करणे. असणारे साठवण टाकीचा परिसर स्वच्छ ठेवणे व टाकी, पंपहाऊस केंद्र, फिल्ट्रेशन प्लँट इमारत, पंपचालक निवासस्थान याची स्वच्छता ठेवणे. शहरातील दररोज होणारी पाईप लाईन गळती काढणे कामी खोदाई करणे, खड्डे भरणे वगैरे कामे कर | प्रति महिना रुपये १,७७,५००/- | २०,०००/- | मजूर सहकारी संस्थेचे रजि . प्रमाणपत्र.<br><br>सेवा पुरविणे कामासंबधी अनुभवाचा दाखला.<br><br>आर्थिक पात्रते संदर्भात आवश्यक दाखले.<br><br>कंपनी अस्तित्वात असल्याबाबत आवश्यक ते शासमान्य पुरावे. | १२ महिने | १५००/- |

**अटी व शर्ती :-**

१. निविदा फॉर्म दिनांक ०९/०६/२०१० पर्यंत म्यु. पल एक खिडकीमध्ये सायं ५.०० वाजेपर्यंत मिळतील.

२. परिपूर्ण सिलबंद निविदा दिनांक १४/०६/२०१० रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत प्रशासकिय अधिकारी चिपळूण नगर परिषद यांचे कक्षामध्ये ठेवलेल्या टेंडर पेटीमध्ये टाकावयाची आहे.

३. निविदा पूर्व बैठक दिनांक ११/०६/२०१० रोजी सायंकाळी ५.०० वाजता मुख्याधिकारी यांचे चेंबरमध्ये होईल.

४. प्राप्त निविदा घारकांच्या निविदा उघडणे बाबतची सूचना नोटीस बोर्डावर लावणेत येईल.

५. सेवा पुरविणे कामासाठी प्रती महिन्याचा दर नमूद करणेचा आहे.

६. उशीरा पोस्टाने/कुरीयरने आलेल्या निविदा स्विकारण्यात येणार नाहीत. कामासंबधी माहिती नगर परिषद पाणी पुरवठा विभागात पहावयास मिळेल. सविस्तर निविदा सूचना नगर परिषदेच्या पाणी पुरवठा विभागामध्ये मागणी केल्यास विनामूल्य उपलब्ध आहेत. किंवा नगर परिषद ऑफिस नोटीस बोर्डावर पहावयास मिळेल. कोणतीही निविदा स्विकृत अथवा अस्विकृत करण्याचे अधिकार राखून ठेवणेत येत आहेत.

**निविदा सूचना क्र. – २०१००४००४**
**दिनांक** :- ०२/०६/२०१०

मुख्याधिकारी अध्यक्ष
चिपळूण नगर परिषद.

टिप :- सविस्तर निविदा सूचना नगर परिषदेचे www. cmcchiplun.org या वेबसाईटवर पहावयास मिळेल.

# पाणी पुरवठा व्यवस्थापनाचे सेवा पुरविणे संबधी अटी व शर्ती.

१. पाणी पुरवठा व्यवस्थापनाचे सेवा पुरवठा धारकांने निविदा मंजूर झाल्यावर सोबतचे करारनाम्याप्रमाणे करारनामा करावयाचा आहे. त्यासोबत अनामत म्हणून देकारांचे १.५० टक्के रक्कम चिपळूण नगर परिषद यांचे नांवे डि.डि अथवा ठेव स्वरुपांत भरावयाची आहे. (ठेव किमान १ वर्षे मुदतीची असणे आवश्यक आहे.)

२. सेवा पुरवठा धारकाला निविदा मंजूर दरा प्रमाणे दरमहा बीलाची रक्कम चेकने देणेत येईल.

३. सेवा संबधी कोणतीही तक्रार आल्यास तसेच याबाबतीत चौकशी व पहाणी मध्ये ठेकेदार यांचा दोष आढळल्यास मुख्याधिकारी ठरवतील तेवढी सेवेची रक्कम बीलातून कापून घेण्यात येईल.

४. सेवा पुरविणे कामासंबधी अहवाल मेस्त्री पाणी पुरवठा विभाग यांचेकडे प्रती महिना बीला सोबत सादर करणे आवश्यक आहे.

५. सेवा पुरवठादार यांचे कामासंबधी कोणताही वाद उत्पन्न झाल्यास याबाबत नगर परिषदेचा निर्णय बंधनकारक असेल.

६. सेवा पुरवठादार यांनी सेवा पुरवतांना हलगर्जीपणा केल्यास त्याबाबत जास्तीत जास्त दोनवेळा सुधारणा करणेसबंधी संधी देणेत येईल. व त्यानंतर सुधारणा न झाल्यास एकतर्फि ठेका रद्द करणेचा अधिकार नगर परिषदेला असेल. व त्यामुळे होणारे नगर परिषदेचे नुकसान ठेकेदारांची अनामत अथवा महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक शहरे अधिनियम १९६५ चे कलम १५०,१५१,१५२,१५३ प्रमाणे वसुलीची कार्यवाही करणेत येईल.

७. सेवा पुरवठाधारकाने दरमहाचे बील महिन्याच्या शेवटच्या कार्यालयीन दिवशी पाणी पुरवठा यांचेकडे सादर करावे. नगर परिषद सदरचे बील प्राप्त झाल्यापासून ८ दिवसांत अदा करणेत येईल.

८. सेवा पुरवठाधारकाला निवीदा देकाराव्यतीरिक्त कोणताही शासकिय कर बिलावर आकारता येणार नाही. शासकिय सर्व कर आवश्यक असल्यास आवश्यक ते परवाने सेवा पूरवठाधारकाने स्वतः घेणेचे आहेत. याबाबतीत कोणतीही कायदेशीर बाबीसाठी नगर परिषद जबाबदार असणार नाही.

९. सेवा पुरवठाधारकाला आवश्यकतेप्रमाणे अपेक्षित सेवा पुरविण्याकरीता गाड्या, मजूर, तांत्रिक कर्मचारी लावता येतील. मात्र कामगार कायद्यांची काटेकोर करणेची जबाबदारी सेवा पुरवठादाराची असेल.

१०.सेवा पूरवठाधारकांने अेकदा देकार भरल्यानंतर बाजारभावात वाढ झाल्यास किंवा अन्य कोणत्याही कारणांनी देकाराची मुदत संपेपर्यंत कोणतीही भाववाढ देणेत येणार नाही.

११.सेवा पुरवठाधारकांनी नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांना गणवेश व ओळख पत्र देणे आवश्यक आहे. व सदरचा गणवेश व ओळखपत्र कर्मचाऱ्यांनी कामावर असतांना वापरणे बंधनकारक आहे.

१२.निविदा देकार मंजूर झाल्यास सेवा पुरवठाधारकाला योग्य मुद्रांकावर करारनामा करुन घ्यावा लागेल. करारनाम्यातील अटी व शर्ती सेवा पुरवठाधारकावर बंधनकारक असतील.

१३.सेवा पुरवठा धारकाचे कामाचे पर्यवेक्षण मेस्त्री, पाणी पुरवठा करतील तसेच सेवांचे मुल्यांकन मुख्याधिकारी व नगर परिषद पाणी पुरवठा समितीमार्फत केले जाईल.

१४.पाणी शुध्दीकरण करणेकामी ब्लिचींग पावडर, तुरटी तसेच क्लोरीन सिलेंडर वापर नगर परिषदेने ठरवुन दिलेल्या प्रमाणा प्रमाणेचे करणेचे आहे. त्यामध्ये कमी प्रमाण आढळल्यास

(ओटी टेस्ट) त्याची सर्वस्वी जबाबदारी ठेकेदार यांचेवर राहिल. व त्याप्रमाणे ठेकेदार यांचेवर कारवाई करणेत येईल.

१५.ठेकेदारांकडून प्रत्येक पंप हाऊस केंद्रातील लॉग बुक, मिटर रिडींग बुक, पॉवर फॅक्ट याचे नोंदी नगर परिषदेने दिलेल्या लॉग बुकामध्ये रोजच्या रोज प्रति तासाला नोंदी घेणेच्या आहेत.

१६.तांत्रिक बिघाड अगर हलगर्जीपणामुळे कर्मचाऱ्यांकडून नगर परिषदेचे पंपाना अथवा मोटारना नुकसान झाल्यास त्याची नुकसान भरपाई ठेकेदाराने द्यावयाची आहे.

१७.करारनाम्यातील अटी व शर्ती तसेच वरील नमूद सर्व अटींचा सेवा पुरवठादाराकडून भंग झाल्यास उपरोक्त ८ प्रमाणे ठेका रद्द करुन नुकसान वसूल करणेत येईल.

१८.अमलात असलेल्या कामगार कायद्यांची पूर्तता करणेची जबाबदारी निविदा धारक यांची राहिल.

१९.करारनामा योग्य मुल्यांच्या मुद्रांकित कागदपत्रावर व यासाठी होणारा खर्च निविदा धारक यांनी स्वतः करावयाचा आहे.

२०.सेवा पुरविणे कामामध्ये सेवा पुरवितांना अपघात झाल्यास त्यावेळी कामगारास दुखापत झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी निविदाधारकांची राहिल.

२१.शासन नियमानुसार कामगारांचा विमा उतरवणेची जबाबदारी निविदा धारक यांची राहिल.

वरील अटी व शर्ती मी वाचल्या असून त्या माझ्यावर बंधनकारक व मान्य असल्याबद्दल मी खाली सहि करीत आहे.

निविदा धारकाची सहि.
कंपनी / संस्था असल्यास
त्याचा रबर स्टॅम्प आवश्यक.